www.rajdand.com
सातारा मंगळवार
६. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

महत्त्वाचे

### अपूर्ण घरकूल धारकांना मोफत वाळू वाटप सुरु

**मंगळवेढा** : मंगळवेढा तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेतील जोता लेवल पर्यंत आलेल्या अपूर्ण घरकूलांना बांधकामासाठी मोफत वाळू देण्यात आल्याने गरीबांच्या घरांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सन २०१६-ते २०२१-२२ मधील ६ हजार ६५६ घरकूलांचे उद्दिष्ट होते. त्यापैकी ५ हजार ४१४ घरकूल पूर्ण झाले असून १ हजार २३४ घरकूल ही वाळू अभावी पूर्ण होवू शकले नाहीत. परिणामी या अपूर्ण घरकूलांना मोफत वाळू देण्याचा शासनाचा आदेश दि.१९ एप्रिल २०२३ प्रमाणे या घरकूलदारांना मोफत १२४ ब्रास वाळू पोलीस स्टेशन आवारातील जप्त केलेली वाटप करण्यात आली.

या वाळू वाटपाला तहसिलदार यांनी हिरवा कंदील दाखविल्याने नुकतेच १२ लाभार्थ्यांना ही वाळू देण्यात आली असून उर्वरीत लाभार्थ्यांनाही त्याचे वाटप केले जाणार आहे. सदर घरकूल योजनेतील २३८ लोकांना गवंडी प्रशिक्षण योजना लागू केली होती त्याप्रमाणे वाळूचे वाटप करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. या वाळू वाटपाचा शुभारंभ आंधळगाव येथील महिला सुवर्णा शिवाजी कुंभार यांना देवून शुभारंभ करण्यात आला.

# अब की बार ४०० पार

# भाजपाला ३७० जागा मिळण्याचा नरेंद्र मोदींना विश्वास

**नवी दिल्ली :** आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत भाषण करत काँग्रेसची शाब्दिक धुलाई केली आहे. भारताचे दिवंगत पंतप्रधान पंडीत नेहरु आणि इंदिरा गांधी हे देशातल्या लोकांना कमी लेखत असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. त्यासाठी त्यांनी या दोघांच्या भाषणांमधले उल्लेखही वाचून दाखवले. आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूनी अभिभाषण केले. त्यानंतरच्या धन्यवाद प्रस्तावात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधक आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला.

राहुल गांधींना मोदी म्हणाले प्रॉडक्ट

गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेस पक्ष सोडला. मल्लिकार्जुन खरगे हे लोकसभेतून राज्यसभेत गेले. एकच प्रॉडक्ट वारंवार लाँच केल्याने काँग्रेसच्या दुकानाला कुलुप लागायची वेळ आली आहे. दुकान आम्ही म्हणत नाही. काँग्रेसचे लोक स्वत:च म्हणत आहेत. आमचं दुकान आहे याचा उल्लेख यांचेच लोक करतात. असे म्हणत नरेंद्र मोदी यांनी राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान' शब्दावर टीका केली. आम्ही घराणेशाहीची चर्चा करतो कारण जो पक्ष कुटुंब चालवते, कुटुंबातल्या लोकांनाच प्राधान्य देते. कुटुंबच सगळे निर्णय घेते त्याला आम्ही घराणेशाही म्हणतो. लोकशाहीत हे योग्य नाही. राजकारणात एका कुटुंबातले दहा लोक आले तरीही काहीच प्रश्न नाही. पण ते त्यांच्या प्रतिभेवर आणि लोकांनी दिलेल्या मतांवर निवडून आलेले हवेत, लादलेले नकोत असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.



''देशातल्या कोट्यवधी जनतेने विकसित भारताची संकल्प यात्रा पाहिली आहे. भगवान राम हे फक्त आपल्या घरी परतले आहेतच. शिवाय अशा एका मंदिराची निर्मिती झाली आहे जे भारतीय संस्कृतीसाठी महत्त्वाचं आहे. आता आमच्या सरकारचा तिसरा कार्यकाळही दूर नाही. १०० ते १२५ दिवस बाकी आहे. अब की बार चारसो पार हे सगळं देश मानतो आहे. मी खरंतर मी इथल्या संख्येबाबत बोलत नाही. मात्र एनडीएला ४०० पार जागा मिळतीलच पण भाजपाला ३७० जागा या निवडणुकीत मिळतील.'' असा विश्वास आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे.

''आमचा तिसरा कार्यकाळ हा खूप मोठ्या निर्णयांचा असणार आहे. मी लाल किल्ल्यावरुन सांगितलं होतं आणि राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या वेळीही बोललो होतो. देशाला पुढच्या एक हजार वर्षापर्यंत समृद्ध ठेवण्याची सुरुवात करणारा आमचा तिसरा कार्यकाळ असेल. एका समृद्ध देशाचा पाया रचणारा हा कार्यकाळ असणार आहे. माझा देशाच्या १४० कोटी भारतीयांवर खूप विश्वास आहे. मागच्या दहा वर्षात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले आहेत. गरीबांना जर साधन मिळालं, स्वाभिमान मिळालं तर गरीबीचा पराभव गरीब माणूस करतो. आम्ही तो मार्ग निवडला.'' असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## आजपर्यंतचा सर्वात मोठा अर्थसंकल्प श्री राम लल्ला यांना समर्पित : मुख्यमंत्री योगी

**लखनऊ** : मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशचा आतापर्यंतचा सर्वात मोठा अर्थसंकल्प भगवान श्री राम यांना समर्पित केला. सोमवारी उत्तर प्रदेश विधानसभेत २०२४-२५चा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. ते म्हणाले की, या अर्थसंकल्पाच्या सुरुवातीला, मध्य आणि शेवटी श्री राम लल्ला आहेत. हा अर्थसंकल्प राज्याच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासाचा दस्तऐवज आहे. यातून राज्याच्या सर्वांगीण संकल्पना पूर्ण होतील. उत्सव, उद्योग आणि आशा हे नव्या यूपीचे चित्र असल्याचे मुख्यमंत्र्यांनी



सांगितले.

पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी पाचव्यांदा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल राज्याचे अर्थमंत्री सुरेश खन्ना यांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्री योगी म्हणाले की, त्यांच्या सरकारचा हा आठवा अर्थसंकल्प राज्याच्या इतिहासातील आतापर्यंतचा ७,३६,४३७.७१ कोटी रुपयांचा सर्वात मोठा अर्थसंकल्प आहे. श्रद्धा, अंत्योदय आणि अर्थव्यवस्थेला समर्पित या अर्थसंकल्पात २०२३-२४ च्या तुलनेत ६.७ टक्के वाढ झाली आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पाच्या आकारमानात झालेली वाढ ही राज्याच्या अर्थव्यवस्थेचा विस्तार करण्याच्या दुहेरी इंजिन सरकारच्या वचनबद्धतेवर आधारित आहे. पंतप्रधानांच्या सबका साथ, सबका विश्वास, सबका विकास आणि सबका प्रयास या संकल्पनेवर आधारित आहे.

## तालुक्यात 'बिबट सफारी' निर्मितीमुळे निसर्ग पर्यटनास चालना मिळेल : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

**मुंबई** : पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने जुन्नर तालुक्यातील आंबेगव्हाण येथे बिबट सफारी सुरु करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेऊन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने ही सफारी सुरु करणार असल्याचे यापूर्वीच जाहीर केले होते. मंत्रिमंडळ निर्णयाने त्यावर शिक्कामोर्तब झाल्याने आता जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरुर तालुक्यातील वन व निसर्ग पर्यटनाला चालना मिळेल अशी अपेक्षा वनमंत्री



सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

जुन्नर वन विभागामध्ये प्रामुख्याने जुन्नर तालुक्यात बिबट वन्यप्राण्यांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांची मागणी विचारात घेऊन बिबट वन्यप्राण्यासाठी जुन्नर तालुक्यातील आंबेगव्हाण येथे बिबट सफारी निर्मिती करण्याचा प्रस्ताव मान्य केला. जुन्नर वन विभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण ५८ हजार ५८८५ हेक्टर वनक्षेत्र समाविष्ट असून या वन विभागात पुणे जिल्ह्याच्या उत्तरेकडील जुन्नर, आंबेगाव, खेड व शिरूर या चार तालुक्यातील वन क्षेत्राचा समावेश होतो. त्यामध्ये शिरूर वगळता जुन्नर, आंबेगाव, खेड हे तालुके पश्चिम घाटाचे वनक्षेत्रात येतात.

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, या चार तालुक्यांना निसर्ग व ऐतिहासिक स्थळांचा मोठा वारसा आहे.

या चारही तालुक्यात पर्यटनाकरीता मोठ्या संख्येने पर्यटक विविध पर्यटन स्थळांना तसेच गड किल्ल्यांना भेटी देत असतात. जुन्नर तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेला किल्ले शिवनेरी, अष्टविनायक गणपतीची लेण्याद्री, ओझर ही धार्मिक स्थळे आणि माळशेज घाट, नाणेघाट, किल्ले जिवधन, किल्ले चावंड ही प्रामुख्याने पर्यटकांची आवडती स्थळे आहेत. राज्य शासनानेही जुन्नर तालुका हा पर्यटन तालुका म्हणुन घोषीत केलेला आहे. या बिबट सफारीने येथील पर्यटनाला अधिक चालना मिळेल आणि रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

## कुणबी आरक्षण पहाणीत अधिकाऱ्यांसमोर अनेक तांत्रिक अडचणी

### आंबेगाव तालुक्यातील चित्र

**रांजणी** : आंबेगाव तालुक्यात कुणबी आरक्षण पहाणीत अंतिम टप्प्यात अधिकाऱ्यांसमोर अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे . वास्तविक पहाता घरोघरी जाऊन अधिकारी वर्ग कुटुंबाची माहिती मोबाईलमध्ये घेत असताना कधी कधी मोबाईलचे चार्जिंग २५ टक्क्याच्या आत आल्यावर मोबाईचे सर्वर वारंवार बंद होत असल्याचे दिसून येते . एकूणच कुणबी आरक्षण पहाणी करत असताना अधिकारी वर्गाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे चित्र सर्वेक्षणाच्या अंतिम टप्प्यात पाहायला मिळत आहे .

तालुक्यात कुणबी आरक्षण पहाणी अंतिम टप्प्यात असून अधिकारी वर्ग मोबाईलच्या माध्यमातून घरोघरी जाऊन कुटुंबाकडून माहिती घेत आहे . मात्र ही माहिती घेताना कुटुंबाचीही दमछाक होत असल्याचे चित्र पाहायला मिळते . तालुक्यात शिक्षक , तलाठी ,ग्रामसेवक ,कृषी सहाय्यक पर्यवेक्षक व इतर कर्मचाऱ्यांमार्फत मराठा समाजातील नागरिकांना कुणबीचे आरक्षण मिळावे म्हणून १८३ प्रश्नांची उत्तरे प्रशासकीय अधिकारी घरोघरी जाऊन मोबाईलमध्ये माहिती घेत आहेत . मात्र सदर उत्तरे देताना कुटुंबांना त्रास तर होतच आहे , मात्र अधिकाऱ्यांचीही दमछाक होत आहे .२५ टक्क्याच्या आत मोबाईल चार्जिंग आल्यावर संबंधित सर्वर बंद पडत असल्याने अधिकाऱ्यांना मानसिक त्रासाला देखील सामोरे जावे लागत आहे .

दरम्यान अधिकारी विचारत असलेल्या प्रश्नावलीमध्ये तुमच्या गावाला जोडणारा रस्ता कसा आहे ? कुटुंबाचा प्रकार कोणता ? तुमच्या जातीचा पारंपारिक व्यवसाय कोणता ? व्यवसाय बदलत असेल तर कारणे ? निवासाचा प्रकार ? घराचे क्षेत्रफळ किती ? घरातील शौचालयास कुठे जाता ? कर्ज घेतले आहे का ? कोणाकडून घेतलेले कर्ज फिटले का ? पंधरा वर्षात स्थावर मालमत्ता विकत घेतली किंवा विकली आहे का ? मुलांची लग्न कोणत्या वयात केले जाते ? लग्न उशिरा होत असेल तर काय कारण ? कुत्रा , मांजर ,साप चावल्यास कोणत्या दवाखान्यात घेऊन जाता ? मुला मुलींनी शिक्षण अर्धवट सोडण्याचे कारण काय ? असे अनेक एकूण १८३ प्रश्न या प्रश्नावलीत असून त्याची उत्तरे देताना कुटुंबांची दमछाक होत असल्याचे पाहायला मिळते .

मराठा समाजाला कुणबीचे आरक्षण मिळावे याकरिता मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण केले .त्यांच्या उपोषणाला यशही आले त्या अनुषंगाने सरकारने कुणबी आरक्षणाचे अधिकाऱ्यांमार्फत सर्वेक्षण सुरू केले खरे ? मात्र हे सर्वेक्षण करत असताना अनेक अडचणी समोर येत असल्याच्या बाबी आता समोर येत आहे . काही कुटुंबे कुणबी असून देखील त्यांचे कुणबीचे फेरफार गहाळ झाल्याचे देखील चित्र पहायला मिळत आहे . त्यातच आता सर्वेक्षण करताना अधिकाऱ्यांच्या नाकीनऊ आले आहे .

## तर विधानसभेला वेगळा विचार; कोणाच्या बापाचं ऐकणार नाही

### अजित पवार यांचा इशारा



**बारामती** : होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या विचाराचा उमेदवार बारामतीकरांनी निवडून द्यावा, यदाकदाचित या निवडणुकीत जर मिठाचा खडा लागला, तर विधानसभा निवडणूकीत वेगळा विचार करेन, मी कोणाच्या बापाचं देखील ऐकणार नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार बोलताना देत बारामतीच्या विकासाला गती द्यायची की खीळ घालायची हे तुम्हीच ठरवा, असे थेट आवाहन देखील त्यांनी बारामतीकरांना केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या या वक्तव्याने पवार कुटुंबातील राजकीय युद्ध लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा भेटणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आमती व्यापारी महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाचे तोंड भरून कौतुक करत असताना त्यांच्या नेतृत्वामुळे जगामध्ये भारताची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून अजित पवार स्वतः उमेदवार आहे असे समजून त्या उमेदवाराला विजयी करा. आपण आमदार या नात्याने पंतप्रधान व संबंधित खात्यांच्या मंत्र्यांची थेट भेट घेऊन बारामती लोकसभा मतदारसंघात मोठी विकास कामे मार्गी लावू. बारामतीसह या मतदारसंघातील रेल्वे स्थानके भव्य दिव्य करण्याबरोबरच इतरही अत्याधुनिक प्रकल्प मार्गी लावू. व्यापाऱ्यांनी व्यापारी दृष्टिकोन ठेवून आपल्या हिताचा विचार करून मी सांगेन त्या उमेदवाराला विजयी करावे असे आवाहन पवार यांनी यावेळी केले.

जेवढा वेळ मी जनतेसाठी देतो, तेवढा वेळ मी माझ्या व्यवसायासाठी दिल्यास मी हेलिकॉप्टर व विमानाने फिरेन, अशी टिप्पणी करत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये कोणी कितीही भावनिक करतील, कोणी कितीही डोळ्यात पाणी आणतील, मात्र बारामतीचा सुरू असलेला विकास अधिक गतिमान करण्यासाठी आपण आपल्या उमेदवाराला साथ द्यावी, असे आवाहन पवार यांनी यावेळी केले.

यावेळी पवार म्हणाले, राज्यातील ४८ जागांपैकी एन डी ए सरकार मधील कोणी कुठे घ्यायच्या, ते आम्ही एकत्रीत ठरवू. मात्र पूर्वीच्या राष्ट्रवादीकडे असलेल्या जागा राष्ट्रवादीलाच मिळतील. मी जी भूमिका घेतलेली आहे, त्या पक्षाचाच उमेदवार बारामती लोकसभा मतदारसंघात उभा केला जाणार आहे. बारामतीकरांनी मात्र विधानसभेला अजित पवारला मतदान करायचे, लोकसभेला विरोधी गटाला मतदान करायचे, असे दोन डगरीवर हात ठेवून चालणार नाही. तुम्हाला विधानसभेला दुसऱ्याला मतदान करायचे असेल तरी करा, लोकसभेला दुसऱ्याला मतदान करायचे असेल तरी करा, मात्र दुटप्पी भूमिका मात्र घेऊ नका, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. माझ्या विचाराचा खासदार जर निवडून आला, तर विकासाची जी गती आहे ती आणखीन वाढेल. अयोध्या, उज्जैन, वाराणसी या ठिकाणी झालेला बदल पहा. आपण देखील तुळजाभवानी मंदिर, अंबाबाई मंदिर, पंढरपूरचे विठ्ठल मंदिर या ठिकाणचा देखील कायापालट करून त्या ठिकाणी अत्याधुनिक सुविधा निर्माण करणार आहोत, असे पवार यांनी यावेळी सांगितले.



## विधवांना पूर्णांगिनी म्हणून संबोधत त्यांना धार्मिक कार्यात सहभागी करा

### रुपाली चाकणकर यांचे आवाहन

**बारामती** : समाजातील विधवांना विधवा म्हणून न संबोधता त्यांना पूर्णांगिनी म्हणून संबोधत त्यांना प्रत्येक धार्मिक कार्यात सन्मानाने सहभागी करावे, असे आवाहन राज्य महिला आयोगाच्या अधक्ष्या रुपालीताई चाकणकर यांनी केले.

निरगुडे, (ता. इंदापूर) या ठिकाणी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या इंदापूर तालुका अध्यक्षा साधना केकाण यांच्या वतीने हळदी कुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे रुपाली चाकणकर बोलत उपस्थित होत्या.

यावेळी चाकणकर म्हणाले ,या हळदी कुंकू समारंभाच्या माध्यमातून नवा संदेश देण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी महिला काँग्रेस करत आहे. समाजाची मानसिकता बदलली पाहिजे. विधवा भगिनींना पूर्णांगिनी म्हणून संबोधत त्यांना प्रत्येक धार्मिक कार्यात स्थान देऊन सहभागी करून घेतले पाहिजे. कमी वयात मुलींचे लग्न करण्याऐवजी त्यांना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करावे. आपल्या मुलींच्या पाठशी आई म्हणून ठामपणे उभे राहावे असे आवाहन करतानाच हुंडा प्रथा व विधवा प्रथा बंदीसाठी ठराव करण्याचे आवाहन उपस्थित महिलांना केले. महाराष्ट्रात ५०० हुन अधिक ग्रामपंचायतीनी विधवा प्रथा बंदीचे ठराव करून खऱ्या अर्थाने आदर्श निर्माण केला आहे. महिलांच्या हक्कांची माहिती महिलांना व्हावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान वाचण्याचे महत्व देखील पटवून सांगितले.

> **विधवा नव्हे; पूर्णांगिनी**
>
> **'विधवा हा शब्द स्त्रियांची वेगळी ओळख करून देत होता. तिचे अपूर्ण असणे दाखवत होता. मात्र, राज्य महिला आयोगाच्या माध्यमातून राज्यभरात विधवा स्त्रियांना 'पूर्णांगिनी' हा शब्द वापरला जावा, यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न केला. या पूर्णांगिनी महिलांना कोणतेही धार्मिक कार्य असेल, समारंभ आणि उत्सव असेल. त्यात योग्य सन्मान दिलाच पाहिजे, अशी माझी ठाम भूमिका आहे.**
>
> **- रुपाली चाकणकर**

यावेळी महिला भगिनींसाठी आयोजित केलेल्या होम मिनिस्टर या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ चाकणकर यांच्या हस्ते संपन्न झाला. रोजच्या जीवनातून विरंगुळा म्हणून मोठ्या संख्येने महिलांनी या स्पर्धेसाठी हजेरी लावली होती.

या कार्यक्रमासाठी भगवानराव भरणे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सारीका भरणे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या राज्य समन्वयकजयश्री पालवे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य वैशाली पाटील, माजी पंचायत समिती सदस्य शितल वणवे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या इंदापूर तालुकाध्यक्ष साधना केकाण, अनुष्का भरणे, उज्वला परदेशी, वंजारवाडीच्या उपसरपंच राणी चौधर, ग्रामपंचायत सदस्य चिन्मयानंदा चौधर, मनीषा चौधर, मदनवाडीच्या माजी सरपंच सारीका बंडगर, मदनवाडी सरपंच अश्विनी बंडगर व भिगवणच्या माजी सरपंच हेमा माडगे, कविता भोसले, रेखा वाकडे, स्वाती राऊत, ज्योती रणधीर, वर्षा राऊत, रेश्मा लकडे, अरुणाबाई गिरीगोसावी, आनंदि पानसरे, निलम काजळे, कमल रसाळ, करिष्मा जगताप, चैत्राली कदम, रेणुका साळूंखे तसेच निरगुडे गावातील व परिसरातील महिला भगिनी उपस्थित होत्या.

# उद्यमशील, उद्योगी, उपेक्षित !

आपल्या बदलत्या अर्थव्यवस्थेची दोन मुख्य प्रतीके. पेटीएम आणि बैजूज. पहिले फिन्टेक वर्गवारीत येते. म्हणजे फायनान्स आणि टेक्नॉलॉजी यांच्या संकरातून तयार झालेले नवे उद्योग.

आपल्या बदलत्या अर्थव्यवस्थेची दोन मुख्य प्रतीके. पेटीएम आणि बैजूज. पहिले फिन्टेक वर्गवारीत येते. म्हणजे फायनान्स आणि टेक्नॉलॉजी यांच्या संकरातून तयार झालेले नवे उद्योग. तर दुसरे शिकवणी वर्गच; पण दूरस्थ तंत्रज्ञानाच्या मदतीने चालणारे. पारंपरिक शिकवणी वर्गात गुरुजी आणि विद्यार्थी समोरासमोर असतात. बैजूजने कोठूनही कोणत्याही वेळेस कोणालाही शिकवण्याचा मार्ग तंत्रज्ञानाच्या मदतीने उपलब्ध करून दिला. ही दोनही क्षेत्रे आधुनिक आणि त्या आधुनिकतेस भारतीय वातावरणास साजेशी मुरड घालण्याचे कसब या दोघांचे. हल्ली असे काही नवे करणाऱ्यांचे कौतुक असे काही केले जाते की या कौतुकयात्रेत सामील न होणारे बाजारद्रोही, अर्थद्रोही आणि अंतिमत: देशद्रोही ठरवण्यापर्यंत मजल जाते. नव्यांचे कौतुक हवे हे खरेच. पण नव्यासाठी निसर्गाचे आणि व्यापारउदिमाचे जे काही मूलभूत नियम असतात ते काही बदलत नाहीत. म्हणजे नव्यांसाठीही सूर्य पूर्वेलाच उगवतो आणि तोटय़ास नफा असे म्हणता येत नाही. पण अलीकडे अनेक गोष्टींप्रमाणे आपले या बाबतही भान सुटले आणि या दोन कंपन्यांस डोक्यावर घेत शिंगे मोडून वासरात शिरण्याच्या या उद्योगात सर्वोच्च सत्ताधारीही सामील झाले. त्यात अलीकडची आभासास वास्तव म्हणून विकण्याची कला आणि अशी बोगस उत्पादने विकत घेणाऱ्यांची वाढती गर्दी ! परिणामी या दोन कंपन्या आपल्या



यशाच्या मानदंड ठरल्या. पण सुमार वकुबाची व्यक्ती कितीही उच्चपदी गेली तरी आज ना उद्या उघडी पडतेच पडते त्याचप्रमाणे या कंपन्यांचे झाले. यातील पेटीएमवर कारवाई करण्याची वेळ रिझव्‍‌र्ह बँकेवर आली आणि बैजूजची पुरती आर्थिक धूप होऊन संस्थापक बैजू रवीन्द्रन यांनाच बैजूज कंपनीतून काढा अशी मागणी करण्याची वेळ या कंपन्यांच्या समभागधारकांवर आली. या दोनही कंपन्यांचा आर्थिक पोकळपणा 'लोकसत्ता' सातत्याने दाखवत आला आहे. तथापि या कंपन्यांचे आता जे झाले ते पाहून 'लोकसत्ता'ची भूमिका किती योग्य होती, हे म्हणण्याचा मोह टाळून वास्तवाचा वेध घ्यायला हवा.

कारण ते जे दिसते त्यापेक्षा अधिक गंभीर आहे. रिझव्‍‌र्ह बँकेने पेटीएमच्या बँकिंग परवान्यावरच घाला घातला. त्यामुळे काय होईल, हे लक्षात घेण्याआधी पेटीएम आणि गूगल पे, फोनपे आदींतील फरक समजून घेणे आवश्यक. गूगल पे, फोनपे आदींची उपयुक्तता फक्त पैसे चुकवण्यापुरतीच असते. गूगलादी यंत्रणा आपल्या बँकेच्या खात्याशी जोडलेल्या असतात आणि या खात्यांतून दुकानदारादींस पैसे देता येतात. पेटीएम यापुढे गेले. बँकिंग परवाना मिळवून पेटीएमने स्वत:च्या ॲपमधे पैसे ठेवण्याची (वॉलेट) व्यवस्था केली. त्यामुळे पेटीएम वापरकर्त्यांस बँक खात्यास हात घालावा लागत नाही. तो/ती या ॲपमधे पैसे 'ठेवू' शकतात. रिझव्‍‌र्ह बँकेने ताज्या कारवाईत पेटीएमची ही सुविधाच काढून घेतली. तशी वेळ आली कारण बँक खाते काढण्यासाठीच्या यमनियमनांची पर्वा न करता पेटीएममार्फत कोटय़वधी रुपयांचे व्यवहार केले गेले. यातील काहींचा संबंध तर चीनशीही असल्याचे बोलले जाते. सर्वसामान्य ग्राहकांस काहीही आर्थिक व्यवहार करावयाचे असतील, बँक/वित्तसंस्थेत काही खाते उघडावयाचे असेल तर आधार, पॅनकार्ड, पत्ता वगैरे तपशील देणे आणि त्याची पडताळणी होणे आवश्यक असते. पेटीएमने हे सर्व धाब्यावर बसवले आणि इतकी मोठी उलाढाल केली. वास्तविक या अशा उठवळ कंपनीस बँकेचा परवाना देणे हेच मुळात अयोग्य होते. तरीही ते दिले गेले. त्यामुळे पेटीएम अन्य अशा यंत्रणांपेक्षा अधिक आकर्षक ठरले. परिणामी बाजारपेठेत पेटीएमची अप्रत्यक्ष मक्तेदारी निर्माण झाली. ती किती असावी ?

आज ऑनलाईन पेमेंट उलाढाल करणाऱ्यांतील तब्बल नऊ कोटी जण पेटीएमच्या पाकिटाचा (वॉलेट) वापर करतात. इतकेच नाही. तर देशातील हमरस्त्यांवरील टोल साधारण सहा कोटी मोटारचालक पेटीएममार्फत भरतात. याच्या जोडीला प्रचंड संख्येने दुकानदार, लहानसहान फळे-भाजीविक्रेते आदी पेटीएमच्या पाकिटातून देवाण-घेवाण करतात. रिझव्‍‌र्ह बँक नेमके हे पाकीट बंद करते. याचे प्रमुख परिणाम दोन होतील. एक म्हणजे इतक्या प्रचंड संख्येने असलेल्या पेटीएमच्या वापरकर्त्यांना नवी व्यवस्था करावी लागेल, त्यासाठी पेटीएमला इतरांप्रमाणे आता वापरकर्त्यांच्या बँक खात्याशी जोडून घ्यावे लागेल आणि दुसरे म्हणजे गूगलपे, फोनपे आदींच्या तुलनेत पेटीएमला जो एक 'अधिक समान' असण्याचा फायदा होत होता, तो यापुढे मिळणार नाही. या क्षेत्रातील काही तज्ज्ञांनी तर पाकीट नसेल तर पेटीएम जिवंत तरी राहील की नाही, असा प्रश्न उपस्थित केला आहे. कारण ही पाकीट-सुविधा हा पेटीएमचा प्राण होता. तो जाईल अशी व्यवस्था रिझव्‍‌र्ह बँकेने केली आहे.

या तुलनेत बैजूजची बात वेगळी. एखाद्या ऑनलाईन शिकवणी वर्गाचे मूल्यांकन होऊन होऊन किती व्हावे त्याचे भान भारतास 'नवउद्यमींची राजधानी' असे घोषित करणाऱ्यांना राहिले नाही आणि या साध्या आभासी शिकवणी वर्गाचा बेडूक स्वत:स बैल नव्हे तर थेट हत्तीच मानू लागला. करोनातील करकचून बंदी काळात या अशा ऑनलाईनी उद्योगांचे फावणे एकवेळ समजून घेता येईल. पण त्यातही आपला सामाजिक विवेक सुटला आणि वरपासून खालपर्यंत सगळेच जण यास डोक्यावर घेते झाले. कोणी कोणास किती डोक्यावर घ्यावे हा ज्याचा त्याचा प्रश्न. इतरांनी त्यात वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. परंतु एरवीचे हे किमान शहाणपण बैजूजबाबत लागू होत नाही. कारण यात अडकलेला सामान्य गुंतवणूकदारांचा पैसा. अशा कंपन्यांचे प्रवर्तक योग्य वेळी आपापली गुंतवणूक नफ्यासह काढून घेतात. त्यांना या गाजराच्या पुंग्यांत किती अडकून पडावे याचे भान असते. पण सामान्य गुंतवणूकदार या अशा पोकळांच्या उदोउदोस भाळतात. नुकसान त्यांचे होते. आपल्या मूल्यांकनात ९९ टक्के ऱ्हास झाल्याची कबुली जेव्हा बैजूजकडून दिली जाते तेव्हा मुळात या इमारती किती तकलादू होत्या याचेच दर्शन घडते. बैजूजच्या अमेरिकी उपकंपनीने तर दिवाळखोरीसाठी अर्ज केला आहे. आपल्यापेक्षा तिकडे बाजारपेठी व्यवस्था अधिक सजग आणि नियमही अधिक कडक. सामान्य गुंतवणूकदारांच्या हितास जराही बाधा येणार नाही याबाबत तेथील नियंत्रक कमालीचे जागरूक असतात. एन्रॉनसारख्या बलाढय़ कंपनीचे काय झाले हे त्याचे उदाहरण.

याउलट आपल्याकडील परिस्थिती. सामान्य गुंतवणूकदार आणि त्याचे हित आपल्या नियामकांच्या प्राधान्य क्रमांवर सगळय़ात शेवटी. हे गुंतवणूकदार नियामकांकडून कसे वाऱ्यावर सोडले जातात याची उदाहरणे डझनांनी आढळतील. पण तरीही परिस्थिती होती तशीच आहे आणि पुढेही आहे तशीच असेल. देशाच्या सर्वोच्च सत्ताधीशाचा वापर पेटीएमच्या जाहिरातीत होतो ते पाहून आणि बैजूजचे मूल्यांकन अकारण वाढताना पाहूनही संबंधित नियामक न पाहिल्यासारखे करतात. पण बाजारपेठ कोणाचाच खोटेपणा फार काळ सहन करीत नाही, हे सत्य या दोघांबाबतही दिसून आले. आता 'जिओ'चे असे संभाव्य पाकीट सुरू होणार असताना पेटीएमचे भेलकांडणे हा केवळ योगायोग असे आपण मानायचे. बैजूजची जागाही कोणी घेईल आणि त्याच्या कौतुकाचे ढोलही असे काही काळ बडवले जातील. उद्यमशील आणि उद्योगी यांतील फरक समजण्याइतकी परिपक्वता जोपर्यंत आपण दाखवत नाही तोपर्यंत याला चढवणे, त्याला उतरवणे याच्या जोडीने सामान्य गुंतवणूकदार उपेक्षित राहणे असेच सुरूच राहील.

# वडगावात'शासन आपल्या दारी'अभियान

## पहिल्या दिवशी नागरिकांना घेतला सरकारी सेवा योजनांचा लाभ

**वडगाव मावळ :** मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या संकल्पनेतून मावळ तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांना विविध प्रकारच्या सरकारी सेवा योजनांचा लाभ मिळावा

यासाठी ५ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी

पर्यंत भेगडे लॉन्स येथे शासन आपल्या दारी हे अभियान राबविण्यात येत आहे.त्या अभियानांतर्गत पहिल्या दिवशी शेकडो नागरिकांना सरकारच्या विविध सेवा व योजनांचा लाभ मिळाला

शासनाच्या योजना, तसेच विविध उपक्रमांची माहिती एकाच छताखाली सहजरित्या उपलब्ध होत असल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला यावेळी या ठिकाणी आमदार सुनील शेळके प्रत्यक्ष उभे राहून कुणाची काहीही गैरसोय तर होत नाही ना, याकडे स्वतः जातीने लक्ष घालत असल्याचे पहायला मिळाले.

नागरिकांना कागदपत्रे उपलब्ध करुन देणारी शासनाची कार्यालये ही वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अनेक कार्यालयात जावे लागते. तसेच सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयांमध्ये जावे लागते.काही वेळा अनेक लोकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते आणि माहिती असुनही योजनांचा लाभ गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे या योजनांचा खरा उद्देश साध्य होत नाही. त्यामुळे या अभियानातून सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला जात आहे.



### अधिकाऱ्यांकडून कामाचा निपटारा

**मावळ तालुक्यातील १०३ ग्रामपंचायती असून, पहिल्याच दिवशी १४ ग्रामपंचायतीच्या हद्दीतील नागरीकांची विविध शासकीय कामे युद्धपातळीवर मार्गी लावण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील येण्या-जाण्याची तसेच नाष्ट्यासह जेवणाचीदेखील सोय आमदार सुनील शेळके यांनी केली आहे. विशेष बाब म्हणजे आमदार सुनील शेळके स्वत: वडगांवमधील भेगडे लॉन्स येथे प्रवेशद्वाराजवळ टेबल लावून बसलेले आहेत. ते स्वत: लक्ष घालून कुणाला काही अडचण तर येत नाही ना याची पाहणी तसेच विचारपूस करत आहेत**

**शासन आपल्या दारी या अभियानाद्वारे नागरिकांना असलेल्या सवलती नागरीकांना समजल्या पाहिजेत. प्रत्येक योजनेचा लाभ प्रत्येक नागरीकाला मिळालयला हवा यासाठी हे अभियान राबवले जात आहे. केवळ शहरातीलच नागरीकांन नाही तर ग्रामिण भागातील नागरीकांनादेखील याचा लाभ मिळायला हवा. हाच या अभियानाचा उद्देश आहे.**

**-आमदार सुनील शेळके**

एकाच छताखाली सर्व समस्यांचे निराकरण

या अभियानात महसूल, कृषी, महावितरण,पाटबंधारे, वन विभाग पंचायत समिती, भूमी अभिलेख तसेच महा-ई-सेवा केंद्र तसेच विविध दस्तावेज उपलब्ध करुन देणारे या विभागांचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक, तलाठी सहभागी झाले असल्यामुळे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण एकाच ठिकाणी होत आहे.

# अजित पवार यांचे थेट सुप्रिया सुळेंना आव्हान

## मी उमेदवार आहे, समजून लोकसभेच्या उमेदवाराला विजयी करा

**बारामती :** होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये बारामती लोकसभा मतदार संघातून अजित पवार हाच लोकसभेचा उमेदवार आहे असे समजून मी जो उमेदवार उभा करीन, त्या उमेदवाराला विजयी करा असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलताना केले, त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात पवार कुटुंबातीलच उमेदवार दिला जाणार असल्याचे अप्रत्यक्ष संकेत त्यांनी देत गेली अनेक वर्ष आपण वरिष्ठांच्या (शरद पवार) विचारांच्या उमेदवाराला विजयी केले, मात्र आता माझ्या विचाराच्या उमेदवाराला साथ द्या असे आवाहन करत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना थेट आव्हान अजित पवार यांनी दिले.



बारामती शहरातील राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष विशाल जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. यावेळी जाहीर सभेत त्यांनी लोकसभेचे रणसिंग फुंकले. बारामती लोकसभा मतदार संघाच्या आपल्या गटाच्या संभाव्य उमेदवाराबाबत मौन बाळगणारे अजित पवार यांनी अनपेक्षितरित्या बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पूर्ण ताकतीने लढविणार असल्याचे अप्रत्यक्ष संकेत त्यांनी आपल्या भाषणात दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे माझे चांगले संबंध असल्याने बारामती लोकसभा मतदार संघातील प्रलंबित प्रश्न मार्गी तातडीने मार्गी लागून अनेक प्रकल्प या मतदारसंघात आणण्यासाठी कोणतीही आता अडचण येणार नाही, असे सांगत उपमुख्यमंत्री पवार म्हणाले,मी केलेल्या विकास कामांची मला जर तुम्हाला पावती द्यायची असेल तर या लोकसभेला मी उभा करेन त्या उमेदवाराच्या पाठीशी बारामतीकरांनी खंबीरपणे उभे राहावे.

यंदाच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मतदारांना भावनिक आवाहन केले जाईल, सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल, ही शेवटची निवडणूक आहे, असे सांगण्याचा प्रयत्न केला जाईल, मात्र भावनिक न होता बारामतीच्या विकासाच्या दृष्टीने कोण उमेदवार विकासाचे प्रकल्प राबवू शकेल, याचा विचार करून बारामतीकरांनी मतदानाचा निर्णय घ्यावा असे आवाहन करत नुसतेच शेवटची निवडणूक म्हणतात ;पण शेवटची निवडणूक केव्हा होईल, हेच समजत नाही, असा टोमणाही त्यांनी शरद पवार यांचे नाव न घेता त्यांना मारला.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव न घेता वरिष्ठ असा उल्लेख करत, अजित पवार यांनी लोकसभेच्या निवडणुकीत आपण ज्याउमेदवाराची निवड करू त्याच उमेदवाराच्या पाठीशी बारामतीकारांनी खंबीरपणे राहावे, असे आवाहन केले.लवकरच बारामती लोकसभेचा उमेदवार आपण जाहीर करणार असल्याचे अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये विकास कामे मार्गी लावणारा खासदार पाहिजे, नुसतेच इकडे तिकडे फिरणारे खासदार नकोत, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता अजित पवार यांनी यावेळी केली.

# एक मुख्यमंत्री दोन उपमुख्यमंत्री तरीही राज्य सांभाळता येत नाही

## आ.जयंत पाटील : आ.बाळासाहेब पाटील शरद पवारांसोबत एकनिष्ठ राहिले

**उंब्रज :** भाजपचा एक आमदार पोलीस ठाण्यात बंदुक घेऊन जातो आणि पोलीस ठाण्यातच गोळ्या झाडतो. मुख्यमंत्र्यांना मी कोट्यावधी रुपये दिले आहेत असे सांगतो. मग मुख्यमंत्रीच गुन्हेगार घडवण्याचे काम करत आहेत का ? असा प्रश्न जयंत पाटील यांनी उपस्थित करून गुन्हेगारीच्या बाबतीत महाराष्ट्र बिहारच्याही पुढे गेला आहे. तर मुख्यमंत्र्यांच्या जवळ असणारा एक आमदार छगन भुजबळ यांना पेकाटात लाथ घालून हाकलून द्या अशी भाषा वापरतो हे धाडस आलं कुठून याचा विचार सर्वांनी करण्याची वेळ आली आहे. एक मुख्यमंत्री व दोन दोन उपमुख्यमंत्री असताना यांना राज्य सांभाळता येत नाही अशी टीका राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.

यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रातला दिशा दिली त्या विचारांचा वारसा शरद पवार यांनी जोपासला त्यामुळे या संकटाच्या काळातही कुणी कितीही वाईटावर असलं तरी जनता त्यांच्या सोबत आहे. देशाची व राज्याची वाटचाल चुकीच्या मार्गाने चालली आहे. त्याला विरोध करण्यासाठी २०२४ ची लोकसभा निवडणूक अत्यंत महत्त्वाची असल्याने लोकसभा निवडीच्या अनुषंगाने तयारीला लागा. कराड उत्तर मधून ४० हजारांचे लीड हवे आहे असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.



**उंब्रज - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा विजय निश्चित मेळाव्यात बोलताना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील**

उंब्रज ता.कराड येथे कराड उत्तर व दक्षिण मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा विजय निश्चित मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील बोलत होते. यावेळी माजी सहकार मंत्री आ. बाळासाहेब पाटील,आ.शशिकांत शिंदे, सत्यजितसिंह पाटणकर, राष्ट्रवादी आयटी सेलचे प्रदेशाध्यक्ष सारंग पाटील, दीपक पवार, जिल्हाध्यक्ष सुनील माने, संगीता साळुंखे, कराड उत्तर अध्यक्षदेवराज पाटील, सुरेशराव माने,जितेंद्र पवार, मेहबूब शेख व मान्यवर उपस्थित होते.

### त्या तोडीचा उमेदवार तयार - शशिकांत शिंदे

**कधी नव्हे सातारा जिल्ह्यात चार-आठ दिवसाला केंद्रीय मंत्री येतात पण हा सातारा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. विजय हा महाविकास आघाडीच्या खासदाराचाच होईल. उमेदवार कोणीही असू द्यात त्या पाठीमागे शरद पवार हे नाव असलं पाहिजे. खरतर मुख्यमंत्री साताऱ्याचे आहेत त्यामुळे लोकसभेला उमेदवारही त्यांचाच हवा. त्यांच्यातील उमेदवाराचे नाव येऊ द्यात, तेवढ्याच तोडीचा उमेदवार आपल्याकडे असेल. येणारी लढाई ही सोपी नाही अजून रान तापायचे आहे.**

**पंतप्रधान १९ तारखेला साताऱ्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे पुरस्कार स्विकारण्यासाठी येत आहेत. पण महाराजांचे स्मारक उभे राहिले का ? याचा जाब विचारण्याची गरज आहे. सत्ताधारी आवाज दाबण्यासाठी सत्तेचा वापर करत आहेत. जे धर्माचे राजकारण सुरू आहे ते थोपवण्यासाठी एकत्र या अन्यथा २०२४ नंतर लोकशाही राहील का नाही यात शंका आहे.**

जयंत पाटील म्हणाले, पक्षात फूट पडली तेव्हा अनेकजन बाहेर पडले.मात्र बाळासाहेब पाटील यांनी कोणतेही चलबिचल न करता निर्भीडपणाने भूमिका घेऊन शरद पवार यांना साथ देऊन यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा वारसा जपला आहे. जे लोक बाजूला गेले त्यांचा गाजावाजा जास्त आहे त्याला घाबरून विचलित होऊ नका, जिथे जास्त वाजते तिथे काहीच नसते. देशातील व राजकीय परिस्थितीवर टिप्पणी करताना जयंत पाटील म्हणाले, महागाई, बेकारी सारखे प्रश्न वाढले आहेत.

देशात रुपयाचे अवमूल्यन झाले असून ८३ रुपयाच्या खाली घसरण झाली आहे. देशाची परिस्थिती चांगली नाही २०५ लाख कोटींचे कर्ज देशावर आहे. प्रत्येकाच्या डोक्यावर दीड लाखाचे कर्ज आहे. जन्माला आलेल्या बाळाच्या डोक्यावर ही दीड लाखाचे कर्ज आहे. त्यामुळे भविष्यात देश आर्थिक अंधकारात जाण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राच्या सध्याच्या राजकारणात जी देणी घेणी सुरू आहेत त्याची चौकशी झाली पाहिजे.

शासन आपल्या दारी या संकल्पनेतून सरकार लोकांची प्रचंड फसवणूक करीत आहे. त्यासाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च येतो. मराठा, ओबीसी आरक्षणावर सरकारचे एकमत नाही. राम आमचे श्रध्दास्थान आहेच परंतु महाराष्ट्रातील इतर देवताही आपल्या सर्वांसाठी महत्त्वाच्या असून देव धर्मावरुन राजकारण नको. आज जनतेचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. ते सोडवण्याची बुद्धी सरकारला नाही त्यामुळे राम राज्याचा अभाव आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा विजय होईल. अनेक नवीन मित्र पक्ष आपल्याला जोडले जातील. ही विचारांची लढाई लढण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे असे आवाहन त्यांनी केले.

## राहुडे -निवडे-पाल रस्तावर निकृष्ट दर्जाचे काम, बांधकाम विभाग झोपले का?

# पाटण तालुक्यात विकासकामांचा नवा पॅटर्न : पक्क्या रस्त्यावरच नवीन रस्त्याचा घाट

**पाटण :** पाटण तालुक्यातील केरा विभागातील केर ते काठीटेक या पक्या रस्त्यावरच सुरू असलेल्या निकृष दर्जाच्या कामाचा पंचनामा होत असतानाच तारळे भागात सुद्धा असाच प्रकार सुरू असलेचे सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर आले आहे, पाटण तालुक्यातील अनेक ठिकाणी पक्क्या रस्त्यावर पुन्हा रस्ता करण्याचा घाट सुरू असून अशी कामे कोणाचे खिशे भरण्यासाठी केले जात आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे, यामुळे पाटण तालुक्यात बांधकाम विभागाच्या आशिर्वादाने विकासकामाचा नवीन पॅटर्न सुरू झाला आहे की काय असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.

याबाबत बांधकाम विभागाने गांधारीची भुमिका घेतली असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.





तारळे विभागातील राहूडे गावच्या हद्दीत निवडे पुनर्वसन गावच्या एस.टी बस स्टॉप पासून पूर्वेकडे जाणारा रस्ता पूर्णपणे चांगला आणि दर्जेदार असताना त्याच रस्तावर पुन्हा नव्याने सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाटण यांचे मार्फत रस्त्याचे काम करण्याचा घाट घातला आहे.या पक्या रस्त्यावर खडीकरण, डांबरीकरण करण्याची कसलीही आवश्यकता नसताना केवळ डांबर न टाकता, खालील रस्ता न खरडता फक्त खडी टाकून रेटून काम केले जात असल्याचे दिसत आहे, अशी कामे करून जनतेच्या पैशांची उधळपट्टी करून कोणाचे खिसे भरले जात आहेत असा प्रश्न तालुक्यातील नागरिकांकडून केला जात आहे, .

**या पूर्वी तालुक्यातील केर ते काटिटेक या पक्क्या रस्त्यावर दुरुस्तीचा घाट घालून निकृष्ट दर्जाचे काम सुरू असल्याचे प्रसारमाध्यमांनी उघडकीस आणले तरीही यावर बांधकाम विभागाच्या अधिकार्यांनी सारवासारव करून रेटून काम सुरू ठेवले, त्यांतर हा दुसरा प्रकार समोर आला आहे. सदर रस्त्याचे सुरु असलेल्या कामाचे फोटो, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत, या कामाची सर्वत्र चर्चा सुरू आहे.**

सार्वजनिक बांधकाम उपविभाग पाटणचे सरकारी अधिकारी आणि संबंधित कॉन्ट्रॅक्टर यांच्यात मिली भगत असून सरकारचा निधी लाटण्याचा हा संतापजनक प्रकार सुरू आहे . या निकृष्ट रस्त्यावरून दुचाकी -चार चाकी वाहने ही ये जा करताना अपघात होऊन मनुष्य हानी होण्याची दाट शक्यता आहे. तरी या निकृष्ट कामाची कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, जिल्हाधिकारी सातारा यांनी चौकशी करून या कामाचे संबंधित अधिकारी, ठेकेदार यांना जबाबदार धरून त्यांच्यावर ८ दिवसात कायदेशीर कारवाई करण्यात यावी.. अन्यथा या निकृष्ट दर्जाच्या आणि बेकायदेशीर कामाच्या विरोधत संबंधित कार्यालयावर स्थानिक लोकांचा मोर्चा काढण्यात येईल असा इशारा या विभागातील नागरिकांनी दिला आहे.

# पंतप्रधान मोदींच्या मातोश्री हिराबेन यांचा इचलकरंजीजवळ अर्धपुतळा



**इचलकरंजी(जि. कोल्हापूर) :** इचलकरंजीपासून ५ किलोमीटरवर असलेल्या खोतवाडी (ता. हातकणंगले) येथील गजानन महाराज मंदिर परिसरात महाराष्ट्रात प्रथमच पंतप्रधाननरेंद्र मोदीयांच्या मातोश्री स्व. हिराबेन मोदी यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला आहे.

भारतमाता आणि गानसमाज्ञी लता मंगेशकर यांचेही अर्धपुतळे साकारण्यात आले आहेत.खोतवाडी येथील गजानन महाराज मंदिराला ब तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाला आहे. या ठिकाणी भारतमातेची २१ फूट भव्य मूर्ती, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त उभारलेला ७५ फूट उंच ध्वजस्तंभ तसेच विविध क्रांतिकारकांची शिल्पे आणि दोन भलेमोठे हत्ती साकारण्यातआले आहेत.

## यंदाही मालमत्ता करवाढ नाही; मंत्रिमंडळ बैठकीत २० महत्त्वाचे निर्णय

# मुंबईकरांना दिलासा

**मुंबई :** शहराच्या दृष्टीने नागरिकांचे लक्ष लागलेल्या करवाढीबाबत महापालिकेच्या प्रस्तावाला अखेर नगरविकास खात्याने मंजुरी दिली आहे.मुंबईतयावर्षीसुद्धा मालमत्ता कर वाढ नाही असा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्याचसोबत उत्पन्नवाढीसाठी शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी सरकारकडून अनुदान देण्यात येणार आहे. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक पार पडली.

**मंत्रिमंडळाचे २० महत्त्वाचे निर्णय कोणते?**

मुंबईकरांना यावर्षी सुद्धा मालमत्ता कर वाढ नाही (नगरविकास विभाग)राज्यात नमो महारोजगार मेळावे आयोजित करणार. २ लाख रोजगार, स्वयंरोजगार निर्माण करणार.(कौशल्य विकास विभाग)ज्येष्ठ नागरिकांसाठी शासन संवेदनशील. मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून ६५ वर्षावरील नागरिकांना लाभ देणार (सामाजिक न्याय विभाग)राज्यातील सर्व पालिकांमध्ये आता नगरोत्थान महाभियान राबवणार. पायाभूत सुविधा बळकट करणार (नगर विकास विभाग) उत्पन्नवाढीसाठी शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी अनुदान देणार (वन विभाग) मधाचे गाव योजना संपूर्ण राज्यात राबवणार. मध उद्योगाला बळकटी (उद्योग विभाग) पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी जुन्नर तालुक्यात बिबट सफारी (वन विभाग)बंजारा, लमाण समाजाच्या तांड्यांचा विकास करणार. मूलभूत सुविधा देणार (ग्राम विकास विभाग)शिर्डी विमानतळाचा अधिक विस्तार, नवीन इमारत उभारणी (सामान्य प्रशासन विभाग) धारावी पुनर्वसनासाठी केंद्राची मिठागर जागा मागणार (गृहनिर्माण विभाग)सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना सुधारित भत्ते (विधि व न्याय विभाग)स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन सांगोला प्रकल्पास सुधारित मान्यता (जलसंपदा विभाग)बिगर कृषी सहकारी संस्थांना अर्थसहाय्य. पतसंस्थांना मजबूत करणार (सहकार विभाग)कोंढाणे लघु प्रकलपाच्या कामास जादा खर्चास मान्यता (जलसंपदा विभाग) तिवसे लघु पाटबंधारे योजनेची पुनर्स्थापना करणार (जलसंपदा विभाग)नांदेडच्या गुरुद्धारासाठी तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्धारा अधिनियम (महसूल विभाग)महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची प्रतिमा उंचावण्यासाठी जनसंपर्क अधिकारी नेमणार (सामान्य प्रशासन विभाग) कृषी विद्यापीठातील शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे वय आता साठ वर्ष (कृषी विभाग)सिंधुदुर्ग जिल्ह्यात सार्वजनिक बांधकामचे नवीन मंडळ कार्यालय (सार्वजनिक बांधकाम विभाग)गोसेवा आयोगासाठी सहआयुक्त पशुसंवर्धन पद (पशुसंवर्धन विभाग)



# केशवनगर भागातील रस्ता खोदाईने नागरिक त्रस्त

**हडपसर :** केशवनगर मधील शिवाजी चौक ते कुंभारवाडा , बुध्द विहार पीएमपीएल बस स्टाफ, रेणुका माता मंदिर चौका पर्यंत रस्ता खोदाई करुन ठेवण्यात आल्याने येथील रस्त्यावर प्रचंड राडारोडा, खडी, माती,धुळ,चिखलमाती आदी रस्त्यावर पसरल्याने व रस्त्याचे काम संथगतीने होत असल्याने केशवनगर भागातील रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. गेले अनेक दिवस झाले मनपा प्रशासनाने रस्ता खोदून ठेवण्यात आला असल्याने धुळ, खडी , मातीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

अनेक ठिकाणी पाणी लाईन फुटल्याने नळाचे पाणी खोदलेल्या मातीत रस्त्यावर आल्याने त्यात जडवाहाने चिखलात अडकून बसत असल्याने येथील रस्त्यावर प्रचंड प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना नागरीकांना करावा लागत आहे.वाहतूक कोंडीत नागरीकांचा तासनतास वेळ जात असल्याने नागरिक होत असलेल्या कामा बद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत. तातडीने पक्का रस्ता तयार करण्यात यावा , होत असलेली वाहतूक कोंडी सुरळीत करण्यात यावी, काम लवकर मार्गी लावण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे हडपसर मतदार संघ अध्यक्ष महादेव दंदी, काँग्रेसचे उपाध्यक्ष रमेश राऊत, आदी नागरीकांनी केली आहे.

# कोल्हापुरात शाहू मिलमधील शाहू महाराजांचे स्मारक लवकरच पूर्ण करू

## पालकमंत्री हसन मुश्रीफांचे आश्वासन

**कोल्हापूर :** श्री शाहू छत्रपती महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक कोल्हापुरातील शाहू मिल येथे येत्या काळात पूर्ण करू, यासाठी वस्त्रोद्योग विभागाकडे जागेसाठी पाठपुरावा करून लवकरच ती हस्तांतरित केली जाईल, असे आश्वासन पालकमंत्रीहसन मुश्रीफयांनी दिले. कोल्हापूरजिल्ह्याला लाभलेली ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा महासंस्कृती महोत्सवामधून सर्वदूर जाईल, असेही ते म्हणाले.

गेल्या पाच दिवसांपासून येथील शाहू मिल येथे सुरू असलेल्या महासंस्कृती महोत्सवाची सांगता रविवारी स्वराज्य-संस्थापक श्रीमंत योगी नाटकाने झाली. यावेळी ते बोलत होते. मुश्रीफ म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज आणि शाहू महाराज यांनी जनतेचं, रयतेचं राज्य राबवून समाजातील प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला; म्हणूनच आजही आपण त्यांच्या पालख्या अभिमानाने वाहतो. त्यांच्या पदपावन स्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक आणि



सांस्कृतिक भूमीतील वारसा विविध सांस्कृतिक महोत्सवांतून पुढील पिढीकडे जायला हवा.'

जिल्हाधिकारी अमोल येडगे म्हणाले, 'अशा प्रकारच्या कार्यक्रमातून आपली परंपरा, आपली संस्कृती पुढील पिढीकडे जाते. असे कार्यक्रम पुन:पुन्हा राबविण्यासाठी राज्य शासन व जिल्हा प्रशासन भविष्यातही प्रयत्न करील.' उपजिल्हाधिकारी संपत खिलारी यांनी आभार मानले.

यावेळी महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी नेमलेल्या अधिकारी, कर्मचारी, अशासकीय सदस्यांना सन्मानित करण्यात आले.

यामध्ये उपविभागीय अधिकारी हरीश धार्मिक, तहसीलदार स्वप्निल रावडे, प्रमोद पाटील, प्रसाद संकपाळ, ऋषिकेश केसकर, चंद्रकांत पाटील, शेखर वळीवडेकर, तेजस खैरमोडे, उदय गायकवाड, आदींचा समावेश होता.

# खुलेआम धारदार तलवार घेऊन फिरणाऱ्या गावगुंडाला तलवारीसह अटक : दौंड पोलीसांची कारवाई

पाटस : गावात धारदार तलवार घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या एका गावगुंडाला दौंड पोलिसांनी तलवारीसह ताब्यात घेतले आहे. गुरूदास निवृत्ती राऊत (रा.राघोबानगर, गिरीम) असे या आरोपीचे नाव असून त्याच्यावर भारतीय हत्यार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि.४ रोजी दौंड पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, गिरीम येथे गुरूदास राऊत हा आपल्या ताब्यात धारदार तलवार बाळगून दौंड परिसरात दहशत निर्माण करत आहे. ही बातमी मिळताच



पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी तात्काळ पोलीस अंमलदारांना पाठवून संबंधीत इसमाला ताब्यात घेतले. त्याच्याजवळ असलेली धारदार तलवारही ताब्यात घेतली आहे. त्यास ताब्यात घेत दौंड पोलीस ठाण्यात आणून गुन्हा दाखल केला आहे. उघडपणे धारदार तलवार बाळगून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार करून व दहशत माजवून कायदा सुव्यवस्था बिघडवण्याचे कृत्य करताना कोणी आढळले तर तात्काळ दौंड पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक संजय जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी स्वप्निल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस हवालदार सुभाष राऊत, नितीन बोराडे, पोलीस नाईक विशाल जावळे, आदेश राऊत, पोलीस शिपाई अमोल देवकाते आदींनी केली आहे.पुढील तपास पोलिस हवालदार महेश भोसले हे करत आहेत.

# कोल्हापूर जिल्ह्यातील ३० हजार शेतकरी पेन्शनपासून वंचित राहणार

**कोल्हापूर:** केंद्र सरकारच्या पीएम किसान पेन्शन योजनेतील लाभार्थ्यांना ई केवायसी, आधार प्रमाणीकरण, आधार लिंक या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी शासनाने दीड वर्षाचा कालावधी दिला होता. जिल्ह्यातील ४ लाख ६२ हजार ४११ शेतकऱ्यांनी ई केवायसी पूर्तता केली आहे. उर्वरित ३० हजार शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या पीएम किसानसह राज्य सरकारच्या नमो पेन्शन योजनेपासून वंचित रहावे लागणार आहे.

देशातील शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी केंद्र सरकारने पाच वर्षांपूर्वी पी. एम. किसान सन्मान योजना सुरू केली. यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याला महिन्याला पाचशे रुपये असे चार महिन्यांचे दोन हजार रुपये वर्षाला तीन टप्यांत दिले जाते. जिल्ह्यात सुमारे साडेपाच लाख



शेतकऱ्यांना सुरुवातीच्या टप्यात पेन्शन मिळत होती. पण, यामध्ये निकषाला फाटा देऊन अनेकजण लाभ घेत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याची लाभार्थ्यांची तपासणी झाली, यामध्ये हजारो लाभार्थ्यांना अपात्र ठरवण्यात आले. यामध्ये लाख ९२ हजार ७१०शेतकरीपात्र ठरले.

त्यानंतर, सबंधितांची केवायसी पूर्तता करण्याची मोहीम केंद्र सरकारने हातात घेतली. गेली दीड वर्ष शासनाने या मोहिमेला मुदतवाढ दिली होती. आतापर्यंत ४ लाख ६२ हजार ४११ जणांनी केवायसी पूर्तता केली आहे. अद्याप ३० हजार २९९ शेतकऱ्यांनी ई केवायसीची पूर्तता केलेली नाही.

या शेतकऱ्यांना केंद्राच्या पेन्शनबरोबरच राज्य सरकारच्या 'नमो' पेन्शनपासून वंचित रहावे लागणार आहे.

# अक्कलकोट शहरात आंबेडकरी जनतेचा विशाल जन आक्रोश महामोर्चा

## मोची ठरला ऐतिहासिक: २५ हजाराहून अधिक आबेडकरी समाज उपस्थित

**अक्कलकोट :** अक्कलकोट मध्ये सोमवार ५ फेब्रुवारी रोजी आंबेडकरी जनतेचा विविध प्रकारच्या मागण्यांसाठी विशाल असा जन आक्रोश महामोर्चा काढण्यात आला. आंबेडकरी समाजासह बहुजन समाजातील जवळपास २५ हजाराहून अधिक महिला , नागरिक ,अबालवृद्ध या जन आक्रोश महामोर्चात उपस्थित होते.

सदरचा जन आक्रोश महामोची हा अक्कलकोट शहरातील भीमनगर येथून दुपारी १२.३० वाजता सुरू झाला. हा जन आक्रोश महामोर्च राजे फत्तेसिंह चौक , मेन रोड , कापड बाजार पेठ , कारंजा चौक , विजय कामगार चौक , बस स्थानक मार्गे एवन चौका पर्यंत जन आक्रोश महामोर्चा काढण्यात आला.

शहर व ग्रामीण भागातील मागासवर्गीय बांधवांवर मोठ्या प्रमाणात होत असलेला अन्याय अत्याचार, जातीयवाद, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानावर संपूर्ण भारत देश चालतो त्यांच्याच पुतळ्याची गुलबर्गा येथे विटंबना करण्यात




आली होती . तसेच अक्कलकोट तालुक्यातील बाणजगोळ , घोळसगाव , हालहळ्ळी या सह विविध गावात मागासवर्गीय जनतेवर मोठया प्रमाणात अन्याय वाढला आहे.

या अत्याचारा विरुद्ध व अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्या करीता भव्य मोर्चा काढण्यात आला.या मोर्चाचा समारोप एवं चौकातील एवं चौक येथे जाहीर सभेमध्ये करण्यात आला. यावेळी आंबेडकरी चळवळीतील नेते माजी नगरसेवक उत्तम गायकवाड आरपीआय आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे ,वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे ,प्रहार जनशक्ती पक्षाचे शहराध्यक्ष अमर शिरसाठ पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे विकी बाबा चौधरी बसपाचे तालुका अध्यक्ष विठ्ठल अरेनवरू अजय मुकणार संदीप मडीखांबे शिलामणी बनसोडे जेष्ठ नेते चंद्रकांत इंगळे माजी उपसभापती सिद्धार्थ गायकवाड छात्र भारती संघटनेचे सचिन बनसोडे तुकाराम दुपारगुडे पुण्याचे रामभाऊ सोनकांबळे राहुल रूही ' सागर सोनकांबळे , बाबूराव बनसोडे, यशवंत नडगम आदीं सह विविध नेते मंडळीच्यां उपस्थितीमध्ये जाहीर सभा पार पडली.

यावेळी उत्तम गायकवाड अविनाश मडीखांबे चंद्रशेखर मडीखांबे विठ्ठल आरेनवरू अजय मुकणात विकीबाबा चौधरी ,सागर सोनकांबळे ,सुहानी मडीखांबे आदीनी मार्गदर्शन केले .यावेळी कर्नाटकातील गुलबर्गा येथील विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या आरोपीना तात्काळ फाशी द्या तसेच अक्कलकोट शहर व तालुक्यात वाढत असलेल्या जातीवादी प्रवृत्तींना वेळीच आवर घाला , त्यांच्यावर पोलीस प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी सर्वच उपस्थित नेते मंडळींनी केली 'याप्रसंगी उपस्थित नेतेमंडळींच्या हस्ते तहसील प्रशासन व पोलीस प्रशासनास निवेदन देण्यात आले .या विशाल जनअक्रोश मोर्चामध्ये अक्कलकोट तालुक्यातील दुधनी मैंदर्गी जेऊर वागदरी हन्नूर चपळगाव दहिटणे कुरनूर नागणसूर करजगी हसापूर सलगर बागेहळी कर्जाळ आदींच विविध गावातून तसेच मुंबई पुणे या ठिकाणच्या तालुक्यातील रहिवाशी आंबेडकरी समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थिती दर्शविली.या जन आक्रोश मोर्चामध्ये आंबेडकरी चळवळीतील सर्वच पक्षाच्या नेतेमंडळींनी काळा पोशाख घालून उपस्थित होते. यावेळी शासनाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. हा जनाक्रोश मोर्चा बस स्थानक परिसरात आल्यानंतर अक्कलकोट शहर रिक्षा चालक मालक संघटनेच्या वतीने मोर्चातील नागरिकांना केळी , पाण्याची बॉटल व चिवडा यांचे वाटप करण्यात आले.

शेवटी आभार शिलामणी बनसोडे यांनी मानले.सदरचा जन आक्रोश मोर्चा हा सहभागी झालेल्या हजारो आंबेडकरी समाज बांधवांच्या उपस्थितीमुळे एक चर्चेचा विषय ठरला होता. या जन आक्रोश मोर्चाची चर्चा सुरू होती.

# गर्भलिंग निदान प्रकरणात माळशिरसचे दोन डॉक्टरांचा सहभाग निष्पन्न

**अकलुज :** गर्भलिंग निदान प्रकरणात माळशिरसचे दोन डॉक्टरांचा सहभाग निष्पन्न झाले आहे. फलटण येथील पिंप्रद गावाजवळील एका उसाच्या फडात गर्भलिंग निदान होत असल्याचे ' स्टिंग ऑपरेशनच्या माध्यमातून समोर आणले होते

फलटण येथील उसाच्या फडात गर्भलिंग निदान करणारे डॉक्टर, तसेच चाचणीनंतर गर्भवती महिलेचा गर्भपात करणाऱ्या डॉक्टरचे नाव वाई पोलिसांच्या तपासांत निष्पन्न झाले असून, या प्रकरणात सोलापूर जिल्ह्यातील माळशिरसचे कनेक्शन समोर आले आहे. संबंधित एका डॉक्टरने अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली असून, त्यांना अटक करण्यासाठी वाई पोलिसांचे पथक त्यांच्या मागावर आहे. लवकरच त्यांना अटक केली जाईल, असे तपासी अधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.फलटण येथील पिंप्रद गावाजवळील एका उसाच्या फडात गर्भलिंग निदान होत असल्याचे स्टिंग ऑपरेशनच्या माध्यमातून समोर आणले होते. त्यानंतर पोलिसांनी या फडात गर्भलिंग निदान चाचणीसाठी गेलेल्या महिलेसह तिचा नातेवाईक आणि एका अज्ञातावर गुन्हा दाखल केला होता. वाई पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब भरणे, सहायक फौजदार विजय शिर्के यांनी, तसेच त्यांच्या पथकाने गेल्या महिनाभरापासून या प्रकरणाचा तपास केला. त्यामध्ये माळशिरसचे कनेक्शन समोर आले.फलटणच्या उसाच्या फडात गर्भलिंग निदान चाचणी केल्यानंतर संबंधित गर्भवती महिलेने माळशिरस येथे जाऊन एका डॉक्टरांकडे गर्भपात केल्याचे तपासांत समोर आले. त्यानंतर वाई पोलिसांचे एक पथक संबंधित डॉक्टरला अटक करण्यासाठी माळशिरसला गेले. मात्र, गुन्हा दाखल झाल्याचे समजताच संबंधित डॉक्टर पसार झाले, तर दुसरीकडे फलटण येथील उसाच्या फडात गर्भलिंग निदान करणारे डॉक्टरही पसार झाले आहेत. हे डॉक्टरही अद्याप पोलिसांच्या हाती लागले नाहीत, तेही फरार आहेत. पोलिसांनी अटक करू नये म्हणून माळशिरसमधील संबंधित डॉक्टरांनी वाई न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली असून, या अर्जावर सोमवारी (दि. ५) सुनावणी होणार आहे.

महत्त्वाचे



## उन्हाचा कडाका सुरू होणार

**पुणे :** उत्तरेकडील थंड वारेमहाराष्ट्राकडेयेणे बंद झाले आहे, त्यामुळे राज्यातील किमान तापमानात वाढ झाली आहे. थंडीची तीव्रता कमी होत असून, किमान तापमान १४ ते १५ अंश सेल्सिअसच्या वरच राहील, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने दिला आहे. सकाळी थंडी जाणवत असून, दुपारी मात्र उन्हाचा कडाका आता हळूहळू सुरू झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून उत्तर भारतामध्ये थंडीची लाट आली होती. तिथे बर्फवारी आणि पाऊसही काही ठिकाणी पडत होता. परिणामीमहाराष्ट्राकडेथंड वारे वाहत होते. त्यामुळे कडाक्याची थंडी पडत होती. ती आता काही अंशी कमी झाली असून, किमान तापमानातही वाढ झाली आहे. सोमवारी पुण्यातील किमान तापमान १५ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले गेले. दुपारी चांगलेच उन्ह जाणवत आहे.राज्यात उत्तरेकडील थंड वारे येत नसल्याने राज्यातील किमान तापमानाचा पारा १० अंशांच्या वर सरकला आहे. गारठाही कमी झाला आहे. आजपासून राज्याच्या किमान तापमानातील वाढ कायम राहण्याचा अंदाज आहे. सध्या उत्तर भारतामधील थंडीचा कडाक्यात कमी अधिक प्रमाण होत आहे. हिमाचल प्रदेश, उत्तरखंड येथे हिमवृष्टी होण्याची शक्यता असल्याने आणि उत्तर भारतामधील राज्यांमध्ये पहाटे दाट धुके पडण्याचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.पुणेशहरातील किमान तापमान

एनडीए : १५.५
शिवाजीनगर : १६.२
पाषाण : १७.१
हडपसर : १९.४
मगरपट्टा : २१.५
वडगावशेरी : २२.३

शहरातील हवामान कोरडे झालेले असून, किमान तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअस वाढ झाली आहे. उत्तरेकडील वाराही सुरू झाल्याने आज रात्रीपासून किमान तापमानात घट होण्यास सुरवात होईल. हवामान बदलून उष्णता वाढू लागेल.

# धावत्या रेल्वेत चढताना मृत्यू, कुटुंबाला ८ लाखांची मदत



**नागपूर :** धावत्या रेल्वेमध्ये चढताना खाली पडून एका प्रवाशाचा मृत्यू झाल्यामुळे पीडित पत्नी, मुलगी व दोन मुलांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आठ लाख रुपये भरपाई मंजूर केली व ही रक्कम चार महिन्यांत अदा करण्याचे निर्देश मध्य रेल्वेला दिले. न्यायमूर्ती गोविंद सानप यांनी हा निर्णय दिला. गौतम पाटील असे मृताचे नाव असून ते वर्धा जिल्ह्यातील रहिवासी होते.

संबंधित रेल्वेचा बुटीबोरीमध्ये पाच मिनिटांचा थांबा होता, पण मार्ग मोकळा नसल्यामुळे ती रेल्वे एक तास खोळंबली. प्रशासनाने रेल्वे विलंबाचे कारण व रेल्वे कधी सुटेल याची माहिती प्रवाशांना दिली नाही. रेल्वे अचानक सुरू झाल्याने पाटील यांची ताळांबळ उडाली. त्यामुळे अपघाताकरिता रेल्वेही जबाबदार आहे, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने निर्णयात नोंदविले.

काय घडले होते?

पपाटील हे कुटुंबीयांसह तुळजापूरला गेले होते. ते १० जून २०११ रोजी परतीच्या प्रवासाकरिता भुसावळ-नागपूर पॅसेंजरमध्ये बसले होते.

परेल्वे बुटीबोरीला थांबल्यानंतर ते खाद्यपदार्थ घेण्यासाठी खाली उतरले होते. रेल्वे अचानक सुरू झाली. ते रेल्वेत चढताना खाली पडून मरण पावले.

आधी दावा नामंजूर

पाटील यांच्या कुटुंबीयांकडून भरपाई मिळावी या मागणीसाठी रेल्वे न्यायाधिकरणात दावा दाखल करण्यात आला होता.

मात्र, रेल्वेमध्ये चढताना झालेल्या अपघाताकरिता पाटील स्वत: कारणीभूत असल्याचे कारण देत दावा नामंजूर केला होता. त्यामुळे कुटुंबीयांनी उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते.

# भाजपा, काँग्रेसची ऑफर पण रासप आजमावणार स्वबळ : महादेव जानकर

**अहमदनगर :** राज्यात राष्ट्रीय समाज पक्षाची ताकद वाढत असून आम्ही ९० हजार ७०० पैकी ६२ हजार बूथ बांधली आहेत. पक्षाने बारामती, शिरूर, परभणी, माढा, नगर, नंदुरबारसह संपूर्ण महाराष्ट्रात लोकसभेची जोरदार तयारी केली आहे. आम्हाला बरोबर येण्यासाठी भाजपा, काँग्रेसची ऑफर आहे. यावेळी मात्र, रासप स्वबळ आजमविणार असल्याचे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी सांगितले.

रासपच्या नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्याचा मेळावा रविवारी शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झाला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पक्षाचे प्रदेश सचिव रवींद्र कोठारी, डॉ.प्रल्हाद पाटील, खानदेश अध्यक्ष शरद बाचकर, जिल्हाध्यक्ष शहाजी कोडकर, महिला अध्यक्षा सुवर्णा जऱ्हाड, मंदाकिनी बडेकर, नाना जुंधारे आदींसह जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

जानकर म्हणाले माझ्या पक्षाचे खासदार व आमदार होणार हे नक्की आहे. त्यामुळे माझ्याकडे इतर पक्षातील अनेक जण तिकीट मागत आहेत. नगरमध्ये पक्षाचे संघटन अजून मजबूत करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी काम करावे. नगर दक्षिण लोकसभा मतदार संघातून पक्षाचे प्रदेश सचिव रवींद्र कोठारी




यांना उमेदवारी जाहीर केली आहे. आम्ही या आधी भाजपबरोबर युती केली होती. मात्र, त्यांनी आमच्या तोंडाला पाने पुसली. भाजप व काँग्रसने देशाची वाट लावली आहे. त्यामळे आगामी काळात जनतेला राष्ट्रीय समाज पक्ष म्हणून एक चांगला पर्याय निर्माण होत आहे. राज्यात ओबीसी, भटक्या विमुक्त जाती जमातींना कोणीही वाली नाही. त्यामुळे राज्यात या समाजाची अवस्था सैरभैर झाली आहे. म्हणून ओबीसींचा मुख्यमंत्री झाल्याशिवाय या समजांना न्याय मिळणार नाही. यासाठी सर्व ओबीसी, भटक्या समाजाने एकत्र यावे.

# जायंटस् ग्रुप ऑफ दुर्गा सहेलीच्यावतीने स्वच्छता अभियान

**शिरोळ :** जायंटस् ग्रुप ऑफ दुर्गा सहेलीच्या वतीने महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त शिरोळ येथील राजश्री शाहू कुमार विद्या मंदिर क्रमांक १ या शाळेत स्वच्छता अभियान राबवून शाळेत उपयोगी असणाऱ्या स्वच्छता साहित्याची भेट देण्यात आली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत जायंटस् ग्रुप ऑफ दुर्गा सहेलीच्या माध्यमातून राजश्री शाहू विद्या मंदिर या शाळेचा शालेय परिसर स्वच्छ करण्यात आला तसेच जायंटस् ग्रुप ऑफ दुर्गा सहेलीच्या माजी अध्यक्षा सौ. अनुराधा वेल्हाळ यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शाळेला स्वच्छता साहित्य भेट दिली.

या प्रसंगी जायंटस् फेड. को ऑरडीनेटर सौ.स्नेहल कुलकर्णी यांनी जायंटस् च्या कार्याची आणि संस्थेबद्दल माहिती सांगितली. जायंटस् ग्रुप ऑफ दुर्गा सहेलीच्या माजी अध्यक्षा सौ.अनुराधा वेल्हाळ, सौ. कुसुम जगदाळे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी जायंटस्. फेडरेशनचे स्पेशल ऑफिसर सुधिर ( भैय्या )कुलकर्णी,जायंटस् ग्रुप ऑफ दुर्गा सहेलीच्या अध्यक्षा सौ. अश्विनी नरूटे , सौ. नलिनी देसाई , सौ संगीता जाधव शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.आशा शहापूरे, शिक्षक बाळासाहेब कोळी रमजान पाथरवट दीपक वावरे श्रीमती भारती इंगळे, सौ. विमल वर्धन, सौ. तेजस्विनी पाटील, सौ. प्रियांका जगदाळे, अश्विनी चुडमुंगे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महत्वकांक्षी जुन्नर बिबट सफारी प्रकल्पास मंजूरी

**नारायणगाव :** उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा महत्वकांक्षी प्रकल्प असलेल्या जुन्नर तालुक्यातील बिबट सफारी प्रकल्पास राज्य मंत्रिमंडळाने आज मंजूरी दिली अशी माहिती आमदार अतुल बेनके यांनी दिली. जुन्नर परिसरातील बिबट्यांची लक्षणीय संख्या पर्यटनवाढीसाठी उपयोगी असल्याचे लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार जुन्नरमध्ये बिबट सफारी सुरु करण्यासाठी आग्रही होते. त्यादृष्टीने सातत्याने बैठका घेऊन पाठपुरावा सुरु होता. आज मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याने जुन्नर वनक्षेत्रातील बिबट सफारीचा मार्ग खुला झाला आहे.

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील मौजे आंबेगव्हाण वनक्षेत्रात बिबट सफारी उभारण्यास दिलेली मान्यता ही सविस्तर प्रकल्प आराखडा तसेच प्रकल्प आराखडा मांडणी अहवालास नवी दिल्लीच्या केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या मान्यतेस अधिन राहून देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या ८०४३.२३ लाख रुपये खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. आमदार अतुल बेनके यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, त्यांना मिळालेली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ यामुळे, जुन्नर तालुक्यातील बिबट सफारीचा आणि पर्यटनवाढीचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

या बिबट सफारीमध्ये पर्यटक व बिबट वन्यप्राणी यांच्या सुरक्षिततेसाठी दुहेरी प्रवेशद्वार तयार करण्यात येणार असून सदर प्रवेशद्वार हे विद्युत स्वयंचलित व सेन्सर असलेले असणार आहे. सफारीमध्ये २.६ कि.मी. लांबीचा अंतर्गत रस्ता तयार करण्यात येणार आहे. हा रस्ता बिबट, वन्यप्राण्यासाठी तयार केलेले पाणवठे, तसेच, त्यांच्या अधिवासाजवळून जाणार असल्याने पर्यटकांना बिबट वन्यप्राणी जवळून पाहण्याचा आनंद घेता येणार आहे. सफारीमध्ये पर्यंटकांना फिरण्यासाठी २० ते २५ आसन क्षमता असलेल्या सुरक्षित तसेच बंदिस्त बस खरेदी करण्यात येणार आहेत. सदर बस सफारी मार्गावरुन विहित वेळेत पर्यटकांसह मार्गक्रमण करतील. हा वेगळा अनुभव असणार आहे.

# कामगार संघटनांकडून १६ फेब्रुवारीला भारत बंदची हाक

सोलापूर - केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात देशभरातील कामगार संघटनांनी भारत बंदची हाक दिली असून यात सोलापूर जिल्हा कामगार संघटना कृती समिती देखील सहभागी होणार आहे. १६ फेब्रुवारी रोजी दत्त नगर येथून सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांचा मोर्चा निघणार आहे, अशी माहिती कामगार संघटना कृती समितीचे प्रमुख तथा माजी आमदार नरसय्या आडम यांनी दिली.

वाढती मागावी रोखावी, दोन कोटी युवकांना रोजगार देणार असल्याचे केंद्र सरकारने जाहीर केले असून याची अंमलबजावणी करावी, विडी व यंत्रमाग कामगारांना किमान वेतनाची अंमलबजावणी करावी,



असंघटित कामगारांसाठी कोश्यारी कमिटीनूसार दहा हजार रुपये पेन्शन द्या यासह इतर मागण्यांसाठी १६ फेब्रुवारीला कामगारांनी संप पुकारला आहे. सीटूच्या नेतृत्वाखाली या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना देण्यात येणार आहे. या बंद मध्ये विडी व यंत्रमाग उद्योगातील कामगार मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती देखील आडम यांनी दिली.

# साने गुरुजी,बहिणाबाई यांना मरणोत्तर 'भारतरत्न'साठी संमेलनात ठराव

**अमळनेर :** खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी व साने गुरुजी यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करावे यासह विविध ठराव पारित करीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा रविवारी संध्याकाळी समारोप झाला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी विधानसभेसह विधान परिषदेत ठराव करावा. या ठरावानुसार केंद्राकडे पाठपुरावा करून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी कटिबध्द असल्याचे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई येथून दृक-श्राव्य ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून संमेलनात थेट सहभागी झाले.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. रवींद्र शोभणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी भाषा विकासमंत्री दीपक केसरकर, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, खासदार उन्मेष पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अ.भा. साहित्य महामंडळाच्या कार्यवाह उज्वला मेहेंदळे, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ.अविनाश जोशी उपस्थित होते.

**अमळनेरला पुस्तकांचे गाव म्हणून दर्जा देणार.**

दीपक केसरकर यांनी अमळनेरला पुस्तकांचे गाव म्हणून दर्जा देणार असल्याची घोषणा केली. यासंदर्भात मंत्री अनिल पाटील यांनी मागणी केली होती. साने गुरुजींना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार द्यावा म्हणून राज्य शासनाकडून केंद्राकडे मागणी करू, यावर्षी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणार, असेही केसरकर यांनी म्हणाले. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.



नीलम गोऱ्हे यांनी मराठी भाषा संवर्धनासाठी विधिमंडळात होत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

महाराष्ट्राच्या विकासावर लक्ष ठेवता-ठेवता डोळ्यांवर ताण पडल्याने डोळ्यांची शस्त्रक्रिया करावी लागली. त्यामुळे संमेलनास येता आले नाही. लेखकांना दर्जेदार राजकीय कादंबऱ्या लिहिण्यासाठी आजच्याएवढा साजेशा काळ कधीही नसेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. रवींद्र शोभणे म्हणाले की, साहित्य संमेलन माझ्यासाठी व्यक्ती म्हणून महत्त्वाचे आहे. स्थानिक आयोजक गेली चार ते पाच वर्षे वेगवेगळ्या संमेलनात हजेरी लावून व्यवस्थांचे निरीक्षण करायचे. अमळनेरला संमेलन झालेच पाहिजे हा त्यांचा निर्धार होता. गेल्यावर्षीचे संमेलन महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या विचारांच्या भूमीत झाले. याच विचारांच्या परंपरेचा धागा अमळनेरला जोडला गेला. साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वात महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या आदर्शांचे मिश्रण होते.

**पुढच्या संमेलनाचे प्रस्ताव मागवले**

उषा तांबे यांनी पुढील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी ३१ मार्च २०२४ पर्यंत प्रस्ताव स्वीकारले जाणार आहेत, असे सांगितले.

### संमेलनात पारित झालेले ठराव

**१) ग्रामीण भागात अनेक मराठी शाळा बंद पडून दुसऱ्या शाळांबरोबर जोडल्या जात आहेत. त्यामुळे विद्यार्थी व पालकांच्या अडचणी वाढत आहेत. यावर सरकारने परिणामकारक योजना कराव्यात.**

**२) मराठीसह सर्व भारतीय भाषांची आकाशवाणी दिल्ली येथून प्रसारित होणारी राष्ट्रीय वार्तापत्रे त्या-त्या राज्यांच्या राजधानीत पाठविण्यात आली. त्यामुळे त्या भाषांचे दिल्लीतील राष्ट्रीय स्थान संपुष्टात आले आहे. ही वार्तापत्रे पुन्हा दिल्लीहून प्रसारीत करण्यात यावीत.**

**३) गुजराथी, मराठी शब्दकोशाची आवृत्ती सुधारून तयार करण्यासाठी शासनाने अनुदान द्यावे.**

**४) बृहमहाराष्ट्रातील मराठी शिक्षण संस्थांना आधुनिकीकरणासाठी महाराष्ट्र सरकारने एकरकमी अनुदान द्यावे.**

**५) काळाच्या ओघात कान्हादेशाचे अपभ्रंश होऊन खान्देश असे नामकरण झाले, ते पूर्ववत कान्हादेश असे करण्यात यावे.**

**६) पूज्य साने गुरूजी यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्याची विनंती राज्य सरकारने केंद्र सरकारकडे करावी.**

**७) कवयित्री बहिणाबाई चौधरी यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार जाहीर करण्याची विनंती राज्य सरकारने केंद्र सरकारकडे करावी.**

**८) मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळालाच पाहिजे.**

**९) जळगाव व धुळे जिल्ह्यासाठी महत्वाच्या पाडळसे धरणाचा केंद्र सरकारच्या योजनेत समाविष्ट करावा. तसा प्रस्ताव केंद्राकडे महाराष्ट्र शासनाने त्वरित पाठवावा.**

# वाई तालुक्यातील कालव्याच्या संदर्भात आमदारांनी जनतेची दिशाभूल करण्याचे उद्योग थांबवावेत : विराज शिंदे

## ढासळलेल्या कालव्याचे काम स्वत:च्या घरात देवूनच जनतेच्या पाठीत खंजीर खुपसला

**जननायक म्हणवून घेणाऱ्या लोकनेत्यांनी जनतेची दिशाभूल करीत निकृष्ठ दर्जाचे काम करून वाई तालुक्यातील जनतेच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे. येणाऱ्या निवडणुकीत त्याची किंमत त्यांना मोजावी लागणार आहे. अशी खरमरीत टीका राष्ट्रीय काँग्रेसचे माजी जिल्हा युवाध्यक्ष विराज शिंदे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.**

**वाई :-** १६ डिसेंबर २०२३ ला पांडे गावच्या हद्दीत धोम धरणाच्या डाव्या कालव्याला रात्रीच्या वेळेत भगदाड पडल्याने १५० उसतोड कामगारांचा जीव टांगणीला लागलेला होता, ओझर्डे गावांतील तरुणांच्या सतर्कतेमुळे त्यांचा व जनावरांचा जीव वाचविण्यात यश आले. डाव्या कालव्याला पडलेल्या भगदाडामुळे गेली दोन महिने शेतीचा व पिण्याच्या प्रश्न जटील झाला. पाटबंधारे खात्यावर दबाव आणून स्वतः च्या भावाला फुटलेल्या बंधार्याचे काम पदरात पाडून घेतले. त्या कालव्याचे काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे काम करून प्रचंड भ्रष्ठाचार केला.

पत्रकात त्यांनी असेही म्हटले आहे, गेली दोन महिने रब्बी हंगामातील पिके पाण्याविना वाळून गेली आहेत. संपूर्ण हंगाम वाया गेला असून त्याच्या नुकसानीला जबाबदार कोण..? असाही प्रश्न उपस्थित करण्यात येत



आहे. कालव्याच्या बांधकामामध्ये निकृष्ठ दर्जाचे मटेरियल वापरल्याने एका दिवसांतच बांधकामाला भेगा पडल्या, संबंधित पाटबंधारे खात्याने फक्त ट्रायल घेतल्याने पुढचा होणारा अनर्थ टळला, परंतु त्यांच्या चुकीच्या केलेल्या कामाची किंमत परिसरातील शेतकऱ्यांना मोजावी लागली, तसेच डाव्या कालव्यावर अवलंबून असणारी कवठे-केंजळ योजना बंद ठेवावी लागली. कवठे-केंजळ योजनेच्या बाबतीत पाटबंधारे खात्याच्या गलथान कारभारामुळे वाईच्या पूर्व भागातील २७ गावांना त्याची झळ पोहोचली आहे. न्यायलयाने कामावर स्टे दिला असूनही निकाल आपल्या बाजूने लागल्याचे आमदार सांगून लोकांची फसवणूक करीत आहेत. योजनेचे पाणी सोडण्याचा संदर्भात न्यायालयाचा काहीही संबंध नाही, न्यायालयाने पाटबंधारे खात्याने दाखल केलेली पाणी सोडण्यासंदर्भातील याचिका फेटाळून लावली. तेथेही आमदारांनी राजकारण करून लोकांना झुलवीत ठेवले आहे. अनेक वेळा भूमिपूजन करून आजमितीला कवठे-केंजळ योजनेचे काम पूर्ण झाले नाही, शंभर कोटींचा निधी वाया गेला असून योजनेचे भवितव्य अंधारात आहे. पांडे येथील कालव्याचे काम प्लास्टिकचे कागद लावून लोकांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम केले आहे. सिमेंटच्या जागी प्लास्टिक कागद किती दिवस टिकतील हे आमदार व पाटबंधारे खात्यालाच माहित, परंतु लोकांची दिशाभूल करण्यात आमदार यशस्वी झाले आहेत.

परंतु माझ्या सारखा हाडाचा कार्यकर्ता हे कदापि खपवून घेणार नाही, रस्त्यावर उतरून पाण्यासाठी संघर्ष करावा लागला तरीही मागे हटणार नाही. त्यातच भरीस-भर रविवारी पहाटे चार वाजता व्याजवाडी परिसरात कालव्याच्या तळातच भगदाड पडून लाखो लिटर पाणी ओढ्यातून वाहून गेले.

या दुर्घटनेने पुन्हा एकदा व्याजवाडी परिसरातील शेतकऱ्यांना आमदारांनी जोरका झटका दिला आहे. आणि पुन्हा एकदा दुष्काळात तेरावा महिना उजाडला आहे, या परिसरातील हातातोंडाशी आलेली रब्बी हंगामातील पिके वाया जाणार आहेत. बळीराजाची वेळ बरी म्हणून कालवा फुटून पाणी ओढ्यातून वाहून गेले, तेच शेतात घुसले असते तर किती नुकसान झाले असते याचा अंदाज न केलेला बरा..!

# १२० दिवस पुरेल इतकाच जनावरांसाठी चारा शिल्लक




**सोलापूर :** यंदाच्या पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे जिल्ह्यात चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ शकते. सध्या जिल्ह्यात फक्त १२० दिवस पुरेल इतका चारा उपलब्ध आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनानेसोलापूरजिल्ह्यात उत्पादन होणारा चारा चारा हा इतर जिल्हा व राज्यात विक्रीस बंदी घालण्यात आली आहे.राज्यात ४० तालुक्यात दुष्काळ व १०२१ महसुली मंडळात दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहीर झाली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील माढा, माळशिरस, सांगोला, मोहोळ तालुक्यात दुष्काळ जाहीर झाला आहे. उर्वरित तालुक्यातही चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील उत्पादित चारा इतर राज्यामध्ये विक्री झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात चारा टंचाई भासण्याची शक्यता आहे.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या कृषी कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या एकत्रिक माहितीनुसार जिल्ह्यातील पशुधनास पुढील १२० दिवस म्हणजेच मे २०२४ अखेर पुरेल इतका चारा उपलब्ध आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात तयार होणारा चारा इतर जिल्हा व राज्यात विक्रीसाठी बंदी आणण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यात चारा टंचाई तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.जुलै २०२४ अखेर बंदी लागू

जिल्हाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम १४४ नुसार त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्ह्यातील उत्पादीत होणारा चारा यांची इतर जिल्ह्यात वाहतुक करण्यास मनाई केली आहे. जुलै २०२४ अखेर ही बंदी लागू असणार आहे.